CMYK

राजकीय अस्तित्वासाठी 'जरांगे पाटील' ठरताहेत अनेकांसाठी प्रचंड आशावादी ! >> पान 2

ग्रामपंचायत स्तरावरील सोडा, शासनाकडील पगारही मिळेना >> पान 3

तुळजापूरमधून महायुतीची राणा पाटील यांनाच उमेदवारी >> पान 4

**सुविचार**

जो धोका पत्करण्यास कचरतो, तो लढाई काय जिंकणार !

दैनिक

# आरंभ मराठी

www.arambhmarathi.com arambhmarathi535@gmail.com DAILY ARAMBH MARATHI

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 1 ले ■ अंक 240 वा ■ बुधवार, दि. 23 ऑक्टोबर 2024 ■ TITLE CODE-MAHMAR52255 ■ पाने 4 ■ किंमत रू. 5

## निवडणुकीच्या आधीच अजित पवारांना मोठा दिलासा, तर शरद पवारांना धक्का

आरंभ मराठी । मुंबई

विधानसभा निवडणूक जाहीर होताच प्रचारसभांचा धुरळा उडाला आहे. याच दरम्यान पक्षाच्या चिन्हावरुन वाटाघाटी सुरु असताना एक मोठी बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी पक्षाचं चिन्हं हे घड्याळच राहणार आहे. सुप्रीम कोर्टानं अजित पवारांना दिलासा दिला आहे. शरद पवार गटाने अजित पवार गटाच्या पक्षाचं चिन्हं घड्याळ वापरण्याची परवानगी देऊन नये अशी मागणी केली होती. ही मागणी सुप्रीम कोर्टानं फेटाळून लावली आहे.

# धाराशिव शहरात विद्यार्थ्यांसह तरुणांमध्ये जोरदार राडा; अर्ध्या तासाने पोलिस पोहोचले

## जिजाऊ चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत छेडछाडीच्या दररोज घटना, टवाळखोरांमध्ये हाणामारी

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरातील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयासमोर मुख्य रस्त्यावरच मंगळवारी (दि.२२) सकाळी दहा वाजता महाविद्यालयीन बाहेरील तरूणांची तुंबळ हाणामारी झाली. अर्धा तास चाललेल्या या राड्यामुळे मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती. हाणामारी करणाऱ्या तरुणांनी रस्त्याच्या कडेला लावलेल्या दुचाकी देखील खाली पाडून त्यांचे नुकसान केले. विशेष म्हणजे अर्धा तास चाललेल्या या गोंधळादरम्यान पोलीस मात्र कुठेच दिसले नाहीत. काही नागरिकांनी हस्तक्षेप करत भांडण मिटवण्याचा प्रयत्न केला. परंतु, बेभान झालेले तरुण चवताळून एकमेकांच्या अंगावर धावून जात असल्याचे चित्र दिसत होते. अर्धा तास प्रचंड तणावाच्या वातावरणानंतर हा वाद निवळला. त्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. परंतु, वादावादी करणारे तरुण तोपर्यंत निघून गेले होते. त्यामुळे पोलिसांनी येऊन फक्त शिट्ट्या फुकण्याचे काम केले.



भांडण झालेल्या ठिकाणापासून फक्त दोनशे मीटर अंतरावर शहर पोलीस स्टेशन आहे. तरीही पोलिसांना अशा प्रकाराची माहिती होत नाही.

छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून जिजाऊ चौकापर्यंत छेडछाडीच्या घटना घडत आहेत.या मुख्य रस्त्यावर दररोजच तरुणांमध्ये वाद होत असून, कॉलेज परिसरात गँग वॉरसारखे प्रकार घडत आहेत. कॉलेज परिसरात पोलिसांनी लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात असून, मुलींच्या छेडछाडीच्या प्रकरणातून हाणामारीचे हे प्रकार घडत असल्याचे दिसते.भोसले हायस्कूलसमोर आणि रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाच्या समोर गुंड प्रवृत्तीचे काही तरुण दररोज टोळक्याने उभे राहतात. काही वेळा हे तरुण खेड्यापाड्यातून आलेल्या तरुणींचा बस स्टॅन्डपर्यंत पाठलाग करतात. या भागात पोलिसांची जरब नसल्यामुळेच गुंड प्रवृत्तीचे तरुण कॉलेज परिसरात दहशत निर्माण करत आहेत.

### निर्भया, छेडछाड पथक फक्त कागदावरच

ग्रामीण भागातील तसेच शहरी भागातील शालेय आणि महाविद्यालयीन तरुणींना सुरक्षित वातावरण मिळावे,यासाठी पोलीस प्रशासनाकडून निर्भया पथक, छेडछाड पथक तयार केले जाते. कॉलेज सुरू झाल्यानंतर जून, जुलै महिन्यात हे पथक काही प्रमाणात सक्रिय असते. परंतु ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यानंतर हे पथक फक्त कागदावरच दिसून येते. रोडवरून जाणाऱ्या मुलींना दहशतीच्या वातावरणात वावरावे लागते. त्यामुळे निर्भया पथक, छेडछाड पथक ही पथके दररोज सक्रिय असावीत, अशी मागणी पालकातून होत आहे.



### पोलीस चौकी तातडीने सुरू करण्याची गरज

कॉलेज परिसर हा संवेदनशील भाग आहे. याठिकाणी दररोजच काही न काही घडामोडी घडत असतात. शिवाय शहराचा विस्तार बार्शी नाका परिसराकडे मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे काही दिवसांपूर्वीच राजमाता जिजाऊ चौकात पोलीस चौकी मंजूर झालेली आहे. पोलीस चौकीला मंजुरी मिळून एक महिना होऊन गेला तरी चौकी स्थापन करण्यासाठी काहीच हालचाली दिसत नाहीत. सध्या आचारसंहिता लागू असल्यामुळे पोलीस चौकी सुरू करण्याचे काम थांबलेले आहे. कदाचित डिसेंबर महिन्यात या कामाला गती मिळेल. परंतु तोपर्यंत कॉलेज परिसरात पोलिसांनी जास्त लक्ष देणे गरजेचे आहे.

### टवाळखोरांमुळे दहशत

ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या सामान्य मुलांना त्रास देणाऱ्या टवाळखोर तरुणांकडून एकट्याला गाठून दमदाटी करून मारहाण केली जात आहे. काहीवेळा गरीब मुलांच्या माध्यमातून मुलींना चिठ्ठी देण्यासाठी दबाव आणला जातो. नकार देणाऱ्या मुलांचा वेगवेगळ्या माध्यमातून छळ केला जात आहे. तसेच शहरातील टवाळखोर तरुण शाळा, महाविद्यालयाच्या परिसरात दहशत निर्माण करत आहेत. अशा तरुणांवर कठोर केल्यास मुली निर्भय वातावरणीय शिक्षण घेऊ शकतील.

## अवैध मद्य विरोधी सलग तिसऱ्या दिवशी छापे

### १७ छाप्यात चार लाखांचा मुद्देमाल जप्त

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात अवैध मद्य विरोधी मोहीम तीव्र केली असून, जिल्ह्यात सलग तिसऱ्या दिवशी पोलिसांनी छापे टाकले. शनिवारी व रविवारी दोन दिवसात ३२ छापे टाकल्यानंतर सोमवारी पोलिसांनी जिल्हा भरात १७ छापे टाकले. पोलीस अधीक्षक संजय जाधव व अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या आदेशावरुन सोमवार (दि.२१) रोजी अवैध मद्य विरोधी विशेष मोहिम राबवण्यात आली. या मोहिमेदरम्यान १७ कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेला गावठी दारु निर्मीतीचा सुमारे ३,३०० लि. द्रव नाशवंत असल्याने तो जागीच ओतून नष्ट करण्यात आला तर सुमारे ७०५ लि. गावठी दारु, ५२० लि.सिंधी ताडी अम्ली द्रव व देशी- विदेशी दारुच्या एकुण १२० बाटल्या असे मद्य जप्त केले. ओतून दिलेला मद्यार्क निर्मीतीचा द्रव व जप्त मद्य यांची एकत्रीत किंमत अंदाजे ४,१४,८०० रुपये आहे. यावरुन १७ व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत ढोकी, लोहारा, उमरगा, भूम,मुरूम, कळंब, तुळजापूर, धाराशिव ग्रामीण, नळदुर्ग, वाशी, धाराशिव शहर या पोलीस ठाण्यात १७ गुन्हे दाखल करण्यात आले.

## सी-व्हिजिल ॲपवर आचारसंहिता भंगाच्या ९१० तक्रारी प्राप्त; यापैकी ८९९ निकाली

## ३४ कोटी ६२ लाख रुपयांची मालमत्ता जप्त

आरंभ मराठी । मुंबई

राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ साठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. १५ ते २२ ऑक्टोबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी-व्हिजिल ॲपवर एकूण ९१० तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ८९९ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. म्हणजे एकूण ९९ टक्के तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत अशी माहिती राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली आहे.




सजग नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी-व्हिजिल ॲप हे कोणत्याही ॲप स्टोअरमधून करता येते. या ॲपव्दारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाव्दारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते.

राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत एकूण ३४ कोटी ६२ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे, आचारसंहितेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरु असल्याचेही डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले.

## धाराशिव मतदारसंघात दोन शिवसेनेत लढत?

### शिंदे सेनेच्या इच्छूक उमेदवारांचे एकमत, आज उमेदवार ठरण्याची शक्यता, राष्ट्रवादीला जागा न सोडण्याची शिवसेना-भाजपची मागणी

आरंभ मराठी । धाराशिव

लोकसभेच्या अपयशापासून जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस रिस्क घेण्यास तयार नाही तर दुसरीकडे कोणत्याही परिस्थितीत धाराशिव-कळंब-विधानसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला सोडू नये, असा पवित्रा भाजपने घेतल्याने राष्ट्रवादी काँग्रेस बॅक फुटवर गेल्याचे सांगण्यात येत आहे.त्यातच शिंदे सेनेतील इच्छूक उमेदवारांनी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांची भेट घेऊन आमच्यापैकी कुणालाही उमेदवारी दिली तरी चालेल, पण जागा राष्ट्रवादीला सोडू नये, अशी विनंती केल्याने धाराशिवच्या मैदानात ठाकरेंची शिवसेनाविरूध्द शिंदेंची शिवसेना, असा सामना होण्याची शक्यता वाढली आहे. उबाठा गटाकडून विद्यमान आमदार कैलास पाटील यांना पुन्हा एकदा उमेदवारी जाहीर झाली आहे तर शिंदे सेनेचा उमेदवार बुधवारी जाहीर होण्याची शक्यता आहे.

लोकसभेला दारूण पराभव झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसला जिल्ह्यात जनाधार नसल्याचे समोर आले होते. त्यानंतर विधानसभेला एकतरी जागा जिल्ह्यात हवी, अशी भूमिका स्थानिक नेत्यांनी घेतली होती.त्यानुसार धाराशिवच्या जागेवर दावा करण्यात येत होता. वास्तविक पाहता या जागेवर शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी दोन महिन्यांपासून तयारी सुरू केली होती. त्यांना पक्षाचे अध्यक्ष अजित पवारांनी तयारी करण्याचे आदेश दिल्याचे सांगण्यात येत होते.मात्र, या पक्षाला जागा सोडूच नये, अशी जाहीर भूमिका भाजपने घेतली. त्यानंतर आमदार काळेंना स्थानिक नेत्यांकडूनही विरोध वाढला.




जागा राष्ट्रवादीला जात असल्याने शिंदे सेनेचे पदाधिकारीही अस्वस्थ झाले होते. त्यांनी मुंबईत ठाण मांडले. कोणत्याही परिस्थितीत जागा राष्ट्रवादी जाऊ नये, यासाठी मतदारसंघातील इच्छूक नेत्यांनी माजी खासदार प्रा.रवींद्र गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांची भेट घेऊन आमच्यापैकी कुणालाही उमेदवारी द्या, पण राष्ट्रवादीला जागा सोडू नका, अशी मागणी केली. या शिष्टमंडळात जिल्हाप्रमुख सूरज साळुंके, सुधीर पाटील,शिवाजी कापसे,अविनाश खापे आदींसह भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे उपस्थित होते. इच्छुकांना खासदार डॉ. शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे सांगण्यात येत आहे. त्यांना मतदारसंघातील परिस्थिती अवगत केली असून, हा मतदारसंघ धनुष्यबाणाचा आहे, शिवाय पक्षाने, मुख्यमंत्री शिंदेंनी केलेल्या कामामुळे पक्षाला यश मिळेल, असा दावा करण्यात आला.

त्यामुळे राष्ट्रवादीसाठी सोडली जाणारी जागा आपल्याकडेच आली, असा विश्र्वास शिवसेनेतील नेते व्यक्त करत आहेत.मात्र, महायुतीमधील जागा वाटपात काय निर्णय घेतला जातो,हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. बुधवारी यासंदर्भातील निर्णय घेतला जाऊ शकतो, असे सांगण्यात येत आहे. मात्र जागा शिवसेनेला सुटल्यास जुन्या आणि नव्या शिवसेनेत आणि सहकाऱ्यांमध्ये सामना होणार आहे.


# हरभऱ्याला पर्याय; शेतकऱ्यांची राजमा पिकाला पसंती

■ नगदी पीक म्हणून राजमा ठरतोय वरदान ■ कळंब तालुक्यात रब्बी हंगामात राजमा पिकाचे क्षेत्र वाढणार

अमोलसिंह चंदेल । आरंभ मराठी

**शिराढोण** : सध्या सर्वच भागातील पारंपरिक शेती संपूष्टात येत असल्याचे चित्र दिसून येत आहे. कमी खर्चात व कमी कालावधीत जास्त उत्पन्न कसे मिळेल याचा अभ्यास करुन सध्या अनेक शेतकरी आपली शेती प्रयोगशिलतेने करत आहेत. या वर्षी कळंब तालूक्यात रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांनी अशाच एका शेंगवर्गीय पिकाची निवड केली आहे. या पिकास राजमा तसेच पावटा असेही संबोधले जाते.

नैसर्गीक प्रकोपामुळे शेतकऱ्यांची होत असलेली आर्थीक कोंडी पाहता शेतकरी मात्र नवनवे प्रयोग करुन कमी कालावधीत जास्तीचे उत्पादन कसे घेता येईल याचा शोध सातत्याने घेत आहेत. यावर्षी रब्बी हंगामासाठी हरभरा या पिकास पर्याय म्हणून शेतकऱ्यांनी अत्यंत कमी खर्चात आणि कमी कालावधीत जास्त उत्पन्न हाती येण्यासाठी राजमा या पिकाची निवड केली आहे. पुर्वी सन १९९८ पुर्वी खरीप हंगामात शेतकरी हे हायब्रीड, बाजरी, पीवळी आदी पिकांची पेरणी करत होते. त्यावेळी सोयाबीन या पिकाची माहितीही शेतकऱ्यांना नव्हती. लातूर येथे एका तेल कंपनीने उद्योग क्षेत्रात पाऊल ठेवून सोयाबीन या पिकाबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती केली. त्यानंतर या खरीप हंगामातील पारंपरिक पिकांची जागा नगदी पिक म्हणून सोयाबीन या पिकाने घेतली. सध्या खरीपातील सोयाबीन हे प्रमुख नगदी पीक म्हणून ओळखले जात आहे. खरीपासोबतच सन २०२२ पर्यंत रब्बी हंगामात शेतकरी हे हरभरा, गहू, ज्वारी हीच पिके आपल्या शेतात घेत होते. सन २०२२ साली काही शेतकऱ्यांनी राजमा या पिकाची रब्बी हंगामात पेरणी केली. त्या शेतकऱ्यांना कमी खर्चात व कमी कालावधीत भरघोस उत्पन्न हाती आले. त्यानंतर सन २०२३ साली राजमा या पिकाची लागवड रब्बी हंगामासाठी वाढली. गत वर्षीही या राजमा पिकास चांगला भाव असल्याने कमी कालावधीत शेतकऱ्यांना आर्थिक समाधान लाभले. या वर्षी मात्र या राजमा पिकास शेतकऱ्यांनी मोठी पसंती दिली आहे. रब्बी हंगामात जास्तीत जास्त शेतकऱ्यांचा कल हा राजमा पिकाकडे असल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे.





### मर रोगामुळे हरभऱ्याची जागा राजमा पिकाने घेतली

कळंब तालूक्यात रब्बी हंगामासाठी हरभरा, गहू, ज्वारीचे क्षेत्र कमी होवून सध्या राजमा पिकाने उभारी घेतली आहे. हरभरा पिकाच्या तूलनेत हरभरा पिकातील मर रोग लक्षात घेता राजमाचे उत्पन्न जास्तीचे येते. त्यामूळे शेतकऱ्यांनी वरुन, फुले, वाघ्या तसेच ब्राझील या राजमा बियानांची निवड करत या वर्षी रब्बीची तयारी सूरु केली आहे. अनेक ठिकाणी राजमाची पेरणीही झाली आहे.

### उत्तर भारतातील राजमा महाराष्ट्रातही दाखल

काळानुसार शेती व्यावसायात बदल होत आहेत. कोणत्या पिकांची लागवड करायची हे त्या उत्पन्नावर शेतकरी आपली शेती विषयक गणिते ठरवत आहेत. उत्तर भारतामध्ये मोठया प्रमाणात घेण्यात येणारा राजमा सध्या महाष्ट्रातही दाखल झाला आहे. कमी कालावधीत येणारे उत्पन्न म्हणून सध्या राजमा पिकाकडे पाहिले जात आहे.

### चार एकर राजमा केला

मी दरवर्षी रब्बी हंगामात हरभरा या पिकाची पेरणी करत होतो. मात्र कमी खर्चात जास्त उत्पन्न गतवर्षी अनेक शेतकऱ्यांना मिळाले. त्यामूळे या वर्षी मी ४ एकर क्षेत्रावर राजमा या पिकाची पेरणी केली आहे. सध्या हे पिक कोळपणी योग्य झाले आहे.

**-चांगदेव माकोडे, शेतकरी, शिराढोण.**

### उत्पन्नाची खात्री म्हणून राजमास पसंती

सध्या पाऊस चांगला झाल्याने शेतकऱ्यांनी या भागात ऊस लागवड सूरु केली आहे. मात्र ऊसातील आंतरपीक म्हणून यावर्षी बहूतांश शेतकरी हे राजमा पिकाची निवड करत आहेत. उत्पन्नाची हमी असल्याने शेतकरी राजमा पिकाकडे वळत आहेत. तालूक्याचा विचार केला तर जास्तीत जास्त शेतकरी रब्बी हंगामासाठी राजमा पेरणीच्या तयारीत आहेत.

**-बाहूबली संगवे, कृषी सेवा केंद्र चालक, शिराढोण**

## पहिल्याच दिवशी ४ विधानसभा मतदारसंघात १९ उमेदवारांनी केली २१४ अर्जाची खरेदी

### पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल नाही

आरंभ मराठी । धाराशिव

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, मंगळवारी (दि.२२) निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध झाली. त्यानंतर अर्ज विक्री आणि अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. धाराशिव जिल्ह्यात ४ विधानसभा मतदारसंघ येतात. यामध्ये २४० - उमरगा, २४१ - तुळजापूर, २४२ - उस्मानाबाद आणि २४३ -परंडा विधानसभा मतदारसंघ येतात. मंगळवारी पहिल्या दिवशी एकाही उमेदवाराने निवडणुकीसाठी अर्ज दाखल केला नाही. पहिल्या दिवशी ९९ इच्छूक उमेदवारांनी २१४ अर्ज खरेदी केले. यामध्ये उमरगा विधानसभा मतदारसंघासाठी १९ व्यक्तींनी ३५ अर्ज, तुळजापूर मतदारसंघासाठी २८ व्यक्तींनी ७३ अर्ज, उस्मानाबाद मतदारसंघासाठी २७ व्यक्तींनी ५२ अर्ज आणि परंडा विधानसभा मतदारसंघासाठी २५ व्यक्तींनी ५४ अर्जाची खरेदी केली.




### निवडणूक कार्यक्रम असा आहे

- अधिसूचना जाहीर करणे -२२ ऑक्टोबर,
- नामांकन अर्ज दाखल करण्याची अंतीम तारीख - २९ ऑक्टोबर,
- नामांकनाची छाननी -३० ऑक्टोबर,
- नामांकन मागे घेण्याची अंतीम तारीख - ४ नोव्हेंबर,
- मतदान तारीख - २० नोव्हेंबर
- मतमोजणी २३ नोव्हेंबर.

CMYK

## महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची जयंती आहे. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा. २३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भाग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता. कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाच्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजारांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैल होगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. जयंतीदिनी राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

# राजकीय अस्तित्वासाठी 'जरांगे पाटील' ठरताहेत अनेकांसाठी प्रचंड आशावादी !

महाराष्ट्रात विधानसभेचे बिगुल वाजलेले आहे. सर्वच पक्षाचे वरिष्ठ नेते मंडळी विविध प्रकारचे डाव टाकून, जातीय, पक्षीय, विभागीय समीकरणे जुळवून उमेदवार देण्याच्या तयारीत आहेत, काही पक्षांची यादी जाहीर झालीय व काहींची लवकरच होण्याची चिन्हे आहेत. यंदाची निवडणूक थेट महाविकासआघाडी विरुद्ध महायुती अशी होईल की वंचित बहुजन आघाडी, परिवर्तन महाशक्ती सारखे पर्याय अनेकांना खुर्ची पासून दूर ठेवतील हे पाहणं लक्षवेधी ठरणार आहे परंतु या सगळ्यांमध्ये एका नावाने अनेकांची झोप उडवली आहे तर कित्येकांना राजकिय नवसंजीवनी मिळेल असे आशादायक चित्र निर्माण केले आहे ते नाव म्हणजे – मनोज जरांगे पाटील.



काही दिवसांपूर्वीच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत 'जरांगे फॅक्टर' सर्वांना पहायला मिळाला, मराठा आरक्षण विरोधी भूमिका मांडणाऱ्या कित्येक उमेदवारांना व पक्षांना त्याचा जोरदार फटका बसला व महाराष्ट्रात इथून पुढे प्रत्येक निवडणुकीत 'जरांगे फॅक्टर' चालणार यावर शिक्कामोर्तब लोकसभेच्या महाराष्ट्रातील व विशेषतः मराठवाड्याच्या निकालाने केला.

यावेळी विधानसभेला मात्र चित्र जरासे वेगळे आहे. कित्येक नेतेमंडळी आपल्या पक्षीय नेत्यांकडून यावेळी विधानसभेची उमेदवारी भेटेल यावर बारीक लक्ष देऊन बसलेली होती. परंतु जसजशी विधानसभा निवडणुक जवळ येऊ लागली तेव्हा मात्र आघाडी व युतीच्या अनेक पक्षांच्या एकत्रितपणामुळे आपल्या पक्षाला ही जागा सुटण्याची चिन्हच नाहीत मग आपल्या उमेदवारीचा तर प्रश्नच येत नाही ही भावना जागृत होऊ लागली. मग उमेदवारीसाठी तिसरा पर्याय शोधताना अनेकांनी वंचित व परिवर्तन महाशक्ती सारखे पर्याय चाचपत तर अनेकांनी नाराजी नाट्य करत पक्षावर उमेदवारीसाठी दबाव आणण्याचा प्रयत्न चालू केला. अनेकांनी बंडखोरीचा निर्णय घेतला तर अनेकांच्या विचार मंथन बैठका चालू आहेतच.

अशातच जरांगे पाटील यांनी २० ऑक्टोबर रोजी आंतरवली येथे विधानसभेसाठी निर्णायक बैठक बोलावली व निर्णय झाला जिथे निवडणूक जिंकू शकण्याची चिन्हे आहेत तिथे आपले उमेदवार उमेदवारी अर्ज भरणार, आपल्या मागण्यांसाठी ५०० च्या बॉण्डवर लिहून पाठिंबा देणाऱ्यांच्या पाठिमागे उभे रहायचे व आरक्षित जागेवर आपल्या विचारांच्या कोणत्याही पक्षाच्या उमेदवारीसाठी निशुल्क काम करायचे.

यातील उमेदवार उभे राहणार या एका निर्णयामुळे लोकसभेत चाललेल्या 'जरांगे फॅक्टर' ची आठवण काढत अनेक पक्षांच्या भुवया उंचावल्या हे मात्र नक्की परंतु आजपर्यंत कित्येक वर्ष उमेवारींसाठी धडपडणाऱ्या, पक्षांकडून कायम दुर्लक्ष असणाऱ्या अनेक राजकीय पुढार्यांना आंतरवलीची ओढ लागलेली असून पटलांकडून उमेदवारीसाठी प्रचंड प्रयत्न होतील यात शंका नाही. या निर्णयामुळे कित्येक राजकीय पुढाऱ्यांची राजकीय पुनवर्सन होईल का व नावापुढे 'आमदार' हे ब्रीद लागेल का हे पाहणं लक्षवेधी ठरेल हे मात्र नक्की.

**– आदेश वैशाली शिवराम शिंदे, धाराशिव**

# महाराष्ट्र केसरी अभिजीत कटके यांच्या घरी प्राप्तीकर विभागाचा छापा, विधानसभेच्या रणधुमाळीत छापेमारी

**आरंभ मराठी । पुणे**

महाराष्ट्र केसरी पहिलवान अभिजीत कटके यांच्या पुण्यातील घरी प्राप्ती कर विभागाने छापा टाकला आहे. त्यांच्या घरातून म हत्वाची कागदपत्रे पथकाने ताब्यात घेतली आहेत. ऐन विधानसभा निवडणूकीच्या रणधुमाळीत कटके यांच्या घरी छापा पडल्यामुळे खळबळ उडाली आहे. अभिजीत कटके हे भाजपचे माजी नगरसेवक अमोल बालवडकर यांचे मेहुणे आहेत.

अभिजीत यांचे वडील चंद्रकांत कटके यांच्या वाघोलीतील घरात मंगळवारी सकाळी प्राप्ती कर विभागाचे अधिकारी पोहोचले होते. पथकाने कागदपत्रांची झाडाझडती घेत, कटके यांच्याकडे विचारपूसही केली. दरम्यान, कोथरूड विधानसभा मतदारसंघात भाजपकडून बंडखोरी करण्याच्या प्रयत्नातील असल्याची भाजपचे माजी नगरसेवक अमोल बालवडकर यांचे सासरे हे चंद्रकांत कटके आहेत. त्यांच्या घरी छपा टाकल्यामुळे ही राजकीय खेळी असल्याची चर्चा रंगली आहे. तसेच, सोमवारी रात्री उशिरा खेड शिवापुर टोल नाक्यावर नाकाबंदीत ५ कोटी रूपये नेर्णाया मोटारीला पोलिसांनी अडविले. त्यांच्याकडील रक्कम जप्त करीत कारवाई केली आहे. ही रक्कम शिंदे गटाच्या आम दाराची असल्याची चर्चा सुरू आहे. मात्र, याबाबत अधिर्कायांनी बोलण्यास नकार दिला आहे.

भाजपचे माजी नगरसेवक अमोल बालवडकर हे कोथरुड विधानसभा मतदारसंघातुन विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. मात्र, भारतीय जनता पक्षाने चंद्रकांत पाटील यांना संबंधित मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. दरम्यान, यापुर्वी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बालवडकर यांच्या घरी जाऊन त्यांची समजुत काढण्याचा प्रयत्न केला होता. त्याचबरोबर भाजपच्या इतर वरिष्ठ नेत्यांनीही त्यांच्यासोबत चर्चा केली होती. बालवडकरांचे सासरे चंद्रकांत कटके यांचे वाघोलीत घर आहे. त्याठिकाणी छापा टाकल्यामुळे खळबळ उडाली आहे.

महाराष्ट्र केसरी अभिजीत कटके यांनी एकदा महाराष्ट्र केसरीचा बहुमान मिळवला. तर दोन वेळा उपमहाराष्ट्र केसरी ठरले आहे. कटके पुण्यातील शिवरामदादा तालम ीचा पहिलवान असून २०१५ मध्ये युवा म हाराष्ट्र केसरीचा मान मिळवला होता. त्यांनी २०१६ मध्ये ज्युनियर राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते.

# आमच्यात गोंधळाचे वातावरण करण्यासाठीच भाजपाने बातम्या पेरल्या, बाळासाहेब थोरातांचा आरोप



**आरंभ मराठी । मुंबई**

विधानसभा निवडणुकीचे २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे, तर याचा निकाल २३ नोव्हेंबरला लागणार आहे. निवडणुकीला जवळपास एक महिन्याचा कालावधी शिल्लक असताना अजूनही महायुती आणि म हाविकास आघाडीमध्ये जागा वाटपाचा तिढा कायम आहे. विदर्भातील १२ जागांवरून ठाकरे गटाने ताठर भूमिका घेतलीय. तर कोणत्याही परिस्थितीत ह्या जागा सोडायच्या नसल्याचं काँग्रेसने ठरवलंय. दरम्यान, महाविकास आघाडीच्या जागावाटपावरून मंगळवारी काँग्रेस नेते आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची मुंबईतील सिल्व्ह ओक येथे भेट घेतली. आमच्या कुठलाही बेबनाव नाही, जागावाटपाचा तिढा लवकरच सुटेल, असंही यावेळी बाळासाहेब थोरात यांनी सांगितले. भेटीनंतर त्यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते.

भाजपाने चुकीच्या बातम्या पेरल्या : काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात पुढे म्हणाले की, मी शरद पवारांची भेट घेतली. आमच्या दोघात चांगली चर्चा झाली. दुपारी तीन वाजता पुन्हा महाविकास आघाडीची बैठक होणार आहे. या बैठकीत जागा वाटपावर चर्चा होईल. दरम्यान, आमच्यामध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण होण्यासाठी भाजपाने बातम्या पेरल्या, असा आरोप थोरात यांनी भाजपावर केला. महाविकास आघाडीत कोणतेही बेबनाव नाही. आम्ही एकत्रच निवडणूक लढवणार आहोत. शरद पवार यांच्यासोबत माझी सकारात्मक चर्चा झाली. महाविकास आघाडीत किंवा शिवसेना (ठाकरे गटात) कोणतेही मतभेद नसल्याचं यावेळी थोरातांनी सांगितले. मात्र विरोधक आणि मुख्यत: भाजपा आमच्याविरोधात चुकीच्या बातम्या पसरवून गोंधळाची परिस्थिती निर्माण करीत असल्याची टीका बाळासाहेब थोरात यांनी भाजपावर केली.

उद्धव ठाकरेंची भेट घेणार: विदर्भातील १२ जागांवरून महाविकास आघाडीमध्ये अजून तिढा सुटला नाही. या १२ जागांची ठाकरे गटाने मागणी केलीय. तर इथे ठाकरे गटाचे वर्चस्व आणि जनमत नाही, या विदर्भातील १२ जागा हा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे, त्यामुळं या जागा आम्हालाच मिळाल्या पाहिजेत, अशी भूमिका काँग्रेसची आहे. एकीकडे भाजपाने पहिली ९९ जणांची यादी जाहीर केलीय. मात्र दुसरीकडे महाविकास आघाडीत अजून जागांचा तिढा सुटत नाही. महाविकास आघाडीतील यादी जाहीर नसल्यामुळं महाविकास आघाडीत मतभेद आहेत का? असा प्रश्न थोरात यांना विचारला असता, आमच्यात कोणतेही मतभेद नाहीत, सर्व काही आलबेल आहे आणि ज्या काही मोजक्या जागांचा तिढा सुटला नाही, त्याबाबत मी आता मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांना भेटण्यासाठी चाललो आहे. त्यांच्याशी चर्चा करणार आणि त्यानंतर दुपारी महाविकास आघाडीची बैठक होईल. या बैठकीतून जागा वाटपाचा तिढा सुटेल आणि लवकरच महाविकास आघाडीची यादी जाहीर होईल, असेही थोरात यांनी सांगितले.

# विधानसभा निवडणुकीची इन्स्टॉलमेंट २५-२५ कोटी; एक गाडी पकडली, चार गाड्या कुठं आहेत, रोहित पवारांचा सवाल

**आरंभ मराठी । मुंबई**

पुणे ग्रामीण पोलिसांनी एक कार पकडून त्यामधील ५ कोटी रुपयाची रोकड जप्त केली आहे. मात्र या कारवाईवर आता विरोधकांकडून मोठी टीका करण्यात येत आहे. उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील नेत्यावर आरोप केल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहित पवार यांनीही सरकारवर हल्लाबोल केला आहे. ''हा विधानसभा निवडणुकीसाठी २५ –२५ कोटी रुपयांचा पहिला हप्ता आहे. यातील एक गाडी पकडण्यात आली, इतर चार गाड्या कुठं आहेत,'' असा सवाल रोहित पवार यांनी केला.

कारमधून पकडले ५ कोटी रुपये : विधानसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूम ीवर पुणे पोलिसांनी तगडा पोलीस बंदोबस्त लावला आहे. या बंदोबस्तात सोमवारी पुणे ग्रामीण पोलिसांनी एका कारमधून तब्बल ५ कोटी रुपयाची रोख रक्कम पकडली आहे. ही रोख रक्कम साताऱ्याकडं नेण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. यावेळी पोलिसांनी ही रोख कोणाची होती, कुठं नेण्यात येत होती, याबाबतची अधिकृत माहिती अद्यापही दिली नाही. मात्र ही रक्कम सोलापूर जिल्ह्यातील एका सत्ताधारी आमदाराची असल्याचा आरोप उबाठा गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी केला.



एक गाडी पकडली चार कुठं गेल्या, रोहित पवारांचा आरोप : राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी सरकारवर मोठा हल्लाबोल केला. ''सत्ताधारी पक्षाच्या उम ेदवारांना निवडणुकीसाठी पहिली इंस्टॉलमेंट म्हणून २५– २५ कोटी दिले गेले असल्याची चर्चा असून काल यातलीच एक गाडी खेड– शिवापूर च्या क्षडोंगारज्झाडीमध्ये पकडली गेली. एक गाडी सापडली पण अजून चार गाड्या कुठे आहेत? लोकसभेलाही सत्ताधाऱ्यांनी पाण्यासारखा पैसा ओतून महाराष्ट्राच्या जनतेला विकत घेण्याचा प्रयत्न केला, परंतु इथल्या स्वाभिमानी जनतेने महायुतीला कात्रजचा घाट दाखवला. विधानसभेलाही क्षदलालीतून आलेल्या पैशाच्या जोरावर रात्रीस खेळ करण्याचा महायुतीचा कानमंत्र असला तरी, महाराष्ट्राशी गद्दारी करणाऱ्या खोकेबाजांना इथली जनता दज्ञ करुन डोंगर दऱ्या बघण्यासाठी पर्मनंट घरी पाठवणार, हे नक्की आहे. कारण 'महाराष्ट्र आहे, गुजरात नाही' हे सत्ताधाऱ्यांनी लक्षात ठेवावं!'' अशी तिखट प्रतिक्रिया रोहित पवार यांनी सोशल माध्यमांवर व्यक्त केली.

# हॅलोईडने ठेवलेले नाव- झेरोग्राफी!

## विश्वात पहिले झेरॉक्स मशिन निर्माण दिन

एखाद्या प्रक्रियेचे नाव सर्वनाम होणे किंवा क्रियापद होणे, ही त्या प्रक्रियेच्या लोकमान्यतेचीच खूण असते. आज जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात, एखाद्या दस्तऐवजाची आहे तशी प्रत काढणे, याला त्याची झेरॉक्स काढणे असेच म्हटले जाते. इतक्या लोकोपयोगी आणि लोकप्रिय तंत्राचा शोध मात्र केवळ शोधकाच्या गरजेतून लागला. चेस्टर कार्लसन नावाच्या अमेरिकेतील स्वामित्व हक्कनोंदणी कार्यालयात काम करणाऱ्या गृहस्थांना, रोज अनेक कागदांच्या प्रती तयार करायला लागायच्या.



कार्लसनला संधिवात असल्याने हे काम त्यांना अतिकष्टदायक होत होते. ते कष्ट कमी करण्यासाठी काही यांत्रिक उपाय शोधावेत म्हणून ते कामाला लागले. घरच्या स्वयंपाकघरात त्यांनी प्रयोग सुरू केले आणि दि.२२ ऑक्टोबर १९३८ रोजी प्रकाशाचा वापर करून प्रती तयार करण्याचे नवीन तंत्र विकसित करण्यात यश मिळविले. सन १९३९ ते १९४४पर्यंत त्यांनी आयबीएम, जीई यांसारख्या विस कंपन्यांचे उंबरठे झिजवले, पण कुणालाच या यंत्रात काही दम आहे, असे वाटले नाही. अखेर सन १९४७मध्ये हॅलोईड कॉर्पोरेशन या न्यूयॉर्कमधील एका छोट्या कंपनीने यात रस दाखवला आणि या यंत्रांचे व्यावसायिक तत्त्वावर उत्पादन करायची तयारी दाखवली. कार्लसन तोपर्यंत या तंत्रज्ञानाला इलेक्ट्रोफोटोकॉपीइन्ग याच नावाने संबोधत होते. हॅलोईडला हे नाव फार लांबलचक वाटल्याने त्यांनी याला झेरोग्राफी हे नाव दिले. ग्रीक भाषेत याचा अर्थ ड्राय रायटिंग– कोरडे लिखाण असा होतो. या तंत्रावर चालणाऱ्या यंत्रांना त्यांनी झेरॉक्स यंत्रे असे नाव दिले आणि पुढे आपल्या कंपनीचे नावही झेरॉक्स कॉर्पोरेशन असे बदलले. झेरॉक्स यंत्राची माहिती घेण्याआधी आपण जरा यामध्ये वापरले गेलेले शास्त्र आणि तंत्रज्ञान समजावून घेऊ. आपण सर्वानीच लहानपणी कपड्यावर फुगा घासल्यावर तो कपड्याला चिकटला जाण्याची जादू अनुभवली आहे. याचे शास्त्रीय कारण स्थिर विद्युत असते, हेही शाळेत शिकल्याचे आठवत असेल. पण यात नक्की काय होते ते पाहू. फुगा कापडावर घासल्याने कापडाच्या पृष्ठभागावरील इलेक्ट्रॉन मोकळे होतात आणि फुग्याला चिकटतात. कापडावरील इलेक्ट्रॉन कमी झाल्याने तो घनभारित– पॉझिटिव्ह होतो तर फुग्यावरील इलेक्ट्रॉन वाढल्याने तो ऋणभारित– निगेटिव्ह होतो. दोन विरुद्ध भाराचे पृष्ठभाग एकमेकांसमोर आल्याने ते एकमेकांना चिकटतात. आता याचा झेरोग्राफीशी काय संबंध? तर विद्युत आणि चुंबकत्व या दोन ऊर्जांनी बनलेल्या प्रकाशामुळे कार्यान्वित होणारा प्रकाशवाहक– फोटोकण्डक्टर हा या तंत्रातील महत्त्वाचा घटक होय. जेव्हा कुठल्याही प्रकाशवाहकावर प्रकाश पडतो तेव्हा त्याचा प्रकाशित झालेला भाग विद्युतभारित होतो, हे तत्त्व या तंत्रज्ञानात वापरले गेले आहे. यंत्रात कार्यप्रणाली अशी चालते– १) प्रभारीकरण– चार्जिंग: प्रकाशवाहक पदार्थाचा थर असलेला दंडगोल उच्च दाबाच्या स्थिर विद्युतभाराने भारित करण्यात येतो. प्रकाश पडल्यावर विद्युतवाहक बनणाऱ्या सेलेनियम नावाच्या अर्धवाहकाचा याकरता उपयोग केला जातो. २) प्रकाशात आणणे– एक्स्पोजर: प्रखर प्रकाशाचा झोत, ज्याची प्रत काढायची आहे त्या मूळ कागदावरून, प्रकाशवाहक दंडगोलावर परावर्तित करण्यात येतो. कोऱ्या भागावरून येणारा प्रकाश त्या भागातील दंडगोलाला विद्युतवाहक बनवतो आणि त्यामुळे त्यातील विद्युतभार जमिनीत जाऊन– अर्थिंग नाहीसा होतो. मूळ कागदावरील मजकूर– चित्रे असलेल्या भागावरून प्रकाश परावर्तित न झाल्याने त्या भागाला सामोरा गेलेला दंडगोलाचा भाग ऋणभारितच राहतो. यालाच स्थिर विद्युत सुप्त– लॅटेंट प्रतिमा म्हणतात. ३) प्रकटीकरण– डेव्हलॅपिंग: प्रतिमा प्रकट करण्यासाठी टोनर– कोरडी रंगीत रासायनिक पूड (शाई नव्हे) वापरतात. ही पूड घनभारित असते. ज्याप्रमाणे फुग्याच्या खेळात फुगा कापडाला चिकटतो, तशीच जेव्हा ही पूड दंडगोलाच्या संपर्कात येते, तेव्हा दंडगोलाच्या ऋणभारित भागावर चिकटते. ४) हस्तांतरण– ट्रान्सफर: दंडगोलावरील ऋणभारापेक्षा जास्त ऋणभार दिलेला कागद जेव्हा दंडगोलाच्या संपर्कात येतो, तेव्हा दंडगोलावर चिकटलेली पूड कागदावर चिकटते आणि या कागदावर मूळ कागदाची हुबेहूब प्रतिमा तयार होते. ५) वितळणे– फ्युजिंग: प्रतिमा उमटलेला कागद दाब देणाऱ्या रोलरमधून पुढे पाठवताना गरम वातावरणाला सामोरा जातो त्यामुळे टोनरची पूड कागदावर वितळून घट्ट चिकटते. प्रत काढण्याची प्रक्रिया: अ) ज्याची प्रत काढावयाची आहे, तो कागद यंत्रातील काचेवर ठेवला जातो आणि त्यावर झाकण ठेवले जाते. आ) दिव्याचा प्रखर झोत कागदावरून परावर्तित केला जातो. कागदावरील प्रतिमेनुसार कमी–जास्त प्रकाश परावर्तित होतो. जिथे कागद कोरा आहे, तिथून जास्त तर जिथे काही लिहिलेले आहे तिथून कमी किंवा अजिबात नाही. इ) मूळ कागदाची विद्युत छाया सेलेनियम या प्रकाशवाहकाचा थर दिलेल्या सरकत्या पट्टीवर पडते. आधुनिक यंत्रात दंडगोलाऐवजी पट्टा वापरतात. ई) पट्टा सरकताना ही छायाप्रतिमा आपल्याबरोबर पुढे नेतो. उ) टोनरच्या डब्याजवळून जाताना त्यातील पूड पट्टीवर पसरली जाते. ऊ) विद्युतभारित पूड पट्टीवर मूळ कागदाची प्रतिमा बनवते. ए) दुसऱ्या सरकत्या पट्टीवरून कोरा कागद सोडला जातो. या कागदाला विद्युतभारित केले जाते. ऐ) विद्युतभारित कागद पहिल्या सरकत्या पट्टीजवळून जाताना त्यावरील टोनरची पूड या कागदावर खेचली जाते आणि क्षणार्धात मूळ कागदावरील प्रतिमा कोऱ्या कागदावर उमटते. ओ) कागद पुढे दाब देणाऱ्या दोन गरम रोलरमधून सरकताना त्यावरील टोनरचे कण वितळून कागदावर कायमस्वरूपी प्रतिमा तयार करतात. औ) यंत्रातून मूळ कागदाची हुबेहूब– गरमागरम प्रत बाहेर पडते. रंगीत प्रती छापताना हेच मूलभूत तंत्र वापरले जाते, फक्त मूळ प्रतिमेच्या छायेतील विद्युतभार वाचून त्याप्रमाणे मूळ रंगाच्या विरोधी रंगाची (लाल– सियान, हिरवा– मॅजेन्टा, निळा– पिवळा) पूड योग्य त्या प्रमाणात पट्टीवर सोडली जाते आणि रंगीत प्रकाशचित्र प्रत यंत्रातून बाहेर पडते. ही यंत्रे डिजिटल तंत्र वापरून चालवता यायला लागल्यापासून मूळ प्रतिमा यंत्रात स्मृतीमध्ये साठवली जाते आणि लेसर तंत्राने छापली जाते किंवा प्रत काढली जाते. आता तर संगणक तंत्र अधिक प्रगत झाल्यामुळे कुठलाही कागद वा प्रतिमा सांख्यिकी– डिजिटल तंत्राने संगणकात साठवता येतात आणि त्याच स्वरूपात कुठेही पाठवता येतात. त्यामुळे भविष्यकाळात झेरॉक्स यंत्र असेल की नाही, हा प्रश्र्नच आहे! !! झेरॉक्स मशिन निर्माण दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!



**श्री. एन. के. कुमार गुरूजी**
मु. पो. ता. जि. गडचिरोली.
मोबा.नं. ७७७५०४१०८६.

## गावगाड्यातील संसार

गावाबाहेर माझं घर
नाही दारिद्र्याला माप
रोज दारू पिऊन येतो
माझा दारुड्या तो बाप

करतो पिऊन धिंगाणा
नाही शुद्ध रहात त्याला
उठून सकाळी लवकर
गुमान जातो मजुरीला

मागची उधारी फेडण्यात
सारा खिसा रिकामा होतो
पुन्हा उधार मिळण्यासाठी
हात जोडून गयावया करतो

उसनंपासनं आणून
आई करितसे भाकरी
लेकरं जगवण्यासाठी
करावी लागे चाकरी

दारु मटन मासे अंडी
मिळत होते खात्यावर
वही पेन पाटी पुस्तक
ना मिळाले उधारीवर



**गोकुळ गायकवाड**
जामखेड: ९४२३१८३८२२

# ग्रामपंचायत स्तरावरील सोडा, शासनाकडील पगारही मिळेना

## ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ

**अभिजीत साळुंखे । आरंभ मराठी**

**लोहारा :** प्रत्येक गावची लोकसंख्या आणि तेथील ग्रामपंचायतीचे उत्पन्न यावरून शासन त्या ग्रामपंचायतीची वर्गवारी ठरवून तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी हिस्सा देते. परंतु, मागील तीन महिन्यांपासून शासनाकडील हा हिस्साही मिळाला नसल्याने लोहारा तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतीतील कर्मचाऱ्यांच्या पगारी रखडल्या आहेत. यामुळे त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. लोहारा तालुक्यात एकूण ४४ ग्रामपंचायती असून, यातील कर्मचाऱ्यांची संख्या जवळपास ६० आहे. या ४४ पैकी कमी उत्पन्न असलेल्या १४ ग्रामपंचायतींना कर्मचाऱ्यांच्या पगारीसाठी ग्रामपंचायत स्तरावरील वेतन काही अपवाद सोडले तर कोणतीच ग्रामपंचायत देत नाही. ज्या देतात त्यांच्याही काही महिन्यांच्या पगारी थकीत आहेत. कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी, राहणीमान भत्ता तर मिळतच नाही. त्यामुळे सर्वस्वी शासन स्तरावरील वेतनावर अवलंबून असलेल्या कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांवर गेल्या तीन महिन्यापासून वेतन नसल्याने उपासमारीची वेळ आली आहे. आर्थिकदृष्ट्या मागास ग्रामपंचायतींना शासनाकडून १०० टक्के रक्कम मिळते. सरासरी मध्यम उत्पन्न असलेल्या २० ग्रामपंचायतींना ७५ टक्के, तर सधन वर्गवारीत येणाऱ्या ७ ग्रामपंचायतींना ५० टक्के हिस्सा मिळतो. उर्वरित रक्कम ग्रामपंचायत स्वनिधीतून देते. मात्र, काही अपवाद वगळता कोणतीच ग्रामपंचायत स्वनिधीमधून वेतन देत नाही, हे वास्तव आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांची सर्वस्वी मदार ही शासनाच्या माध्यमातून होणाऱ्या वेतनावरच असते. मात्र, मागील तीन महिन्यापासून शासनाकडील हा हिस्साही मिळाला नसल्याने या कर्मचाऱ्यांच्या पगारी रखडल्या आहेत. प्रशासन विधानसभेच्या निवडणुकीत व्यस्त असल्याने या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप कर्मचारी करीत आहेत. दरम्यान, आता तरी जिल्हा परिषद प्रशासनाने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतना संदर्भात तात्काळ प्रक्रिया पूर्ण करावी. शिवाय स्वनिधीतून कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याबाबत प्रत्येक ग्रा. पं.ला आदेशित करावे, अशीही मागणी पुढे येत आहे. दिवाळीपूर्वी शासनाने कर्मचाऱ्यांचे वेतन दिले तर दिवाळी गोड होणार आहे. अन्यथा या कर्मचाऱ्यांना पगारीविना दिवाळी साजरी करावी लागणार आहे.



# शारदीय नवरात्र उत्सवात तुळजाभवानी देवीला भाविकांचे भरभरून दान

## उत्सव काळात मंदिर संस्थानला ६ कोटी ६६ लाख रुपयांचे उत्पन्न

**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजाभवानीचा शारदीय नवरात्र उत्सव दिनांक ३ ते १८ ऑक्टोबर यादरम्यान उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. या कालावधीत राज्यासह शेजारच्या कर्नाटक, आंध्र, तेलंगणा, गुजरात या परराज्यातून लाखो भाविकांनी शहरात येऊन तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. या कालावधीत मंदिर संस्थानला सर्व मार्गातून ६ कोटी ६६ लाख रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. यात सर्वाधिक उत्पन्न देणगी दर्शनातून मिळाले आहे. त्या खालोखाल सिंहासन पेटी व दान पेटीतून कोट्यवधीचे उत्पन्न मिळाले आहे. देवी भाविकांनी नवसपुर्तीसाठी तुळजाभवानीला सोने व चांदी अर्पण केले आहे यात ६९७ ग्रॅम सोने तर १६ किलो चांदी वाहीक स्वरूपात मिळाले. आजच्या बाजार भावाप्रमाणे या दोन्हीची किंमत ६५ लाख रुपये एवढी होते. सर्व बाजूंनी एकूण उत्पन्न ६ कोटी १ लाख ४२ हजार रुपये एवढे प्राप्त झाले आहे. देणगीपास दर्शन २ कोटी ५२ लाख १६ हजार ६०० रुपये, सिंहासनपेटी १ कोटी ५४ लाख ५ हजार ११० रुपये इतर दानपेटी १ कोटी १४ लाख ४५ हजार ९७० रुपये, विश्र्वस्त निधी पेटी २६ लाख १५ हजार २३ रुपये, देणगी दर्शन यूपीआय १९ लाख २२ हजार ६०० रुपये, ऑनलाइन दर्शन २७ लाख रुपये, अभिषेक पूजा ३ लाख २३ हजार रुपये, मनीऑर्डर देणगी २ लाख ६३ हजार १९१ रुपये, चेकद्वारे देणगी २ लाख १ हजार ८२७ रुपये, फोटो विक्रीतून उत्पन्न १७ हजार ५२२ रुपये, रोख रक्कम अर्पण १६ हजार ३१६ रुपये, इतर विविध मार्गातून उत्पन्न २७ हजार रुपये असे एकूण ६ कोटी ६६ लाख ४२ हजार रुपये प्राप्त झाले आहेत. कोजागिरी व अश्विन पौर्णिमा या दोन दिवशी १ लाख ४२ हजार ६०० भाविकांनी मंदिरात जाऊन तुळजाभवानीचे दर्शन घेतले अशी माहिती व्यवस्थापक तहसीलदार माया माने यांनी दिली. उर्वरित आलेल्या भाविकांनी घाटशीळ दर्शन, शिखर दर्शन व कळस दर्शन घेऊन गावी परतावा केला. संपूर्ण शारदीय नवरात्रोत्सव काळात मंदिरात एकूण ९ लाख भाविकांनी हजेरी लावली. तर उर्वरित लाखो भाविकांनी कळस दर्शन घेऊन शहरात हजेरी लावली. दीड लाख भाविकांनी शिखर व कळस दर्शन घेतले असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

### भाविकांना सोई देण्यात मंदिर संस्थान अपयशी

नवरात्र महोत्सवात कोट्यवधी रुपयांचे दान देण्याऱ्या भाविकांना सुविधा देण्यात मंदिर प्रशासन अपयशी ठरल्याचे दिसून आले. नवरात्र महोत्सव काळात भाविकांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागला. शहरात स्वच्छतेचा अभाव दिसून आला. यात्रा काळात अनेक ठिकाणी कचरा पडलेला दिसून येत होता. तसेच भाविकांना अंघोळीला देखील भवानी कुंडात वीस रुपये मोजावे लागले. पेड पासचा गोंधळ संपूर्ण नवरात्र उत्सव काळात सुरूच होता.

----------------------------------------

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात उमरगा येथील जिल्हा परिषद शाळेचा द्वितीय क्रमांक

## शाळेला पाच लाखांचे बक्षीस

**आरंभ मराठी । उमरगा**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा क्रमांक दोन मध्ये धाराशिव जिल्ह्यात उमरगा येथील जिल्हा परिषद शाळेने द्वितीय क्रमांक पटकावून पाच लाखाचे बक्षीस मिळवले. शाळेने गेल्या वर्षी तालुक्यातील प्रथम क्रमांकाचे तीन लाखाचे बक्षीस मिळविले होते. पाच वर्षात केलेल्या शैक्षणिक प्रगतीमुळे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे यांचे मार्गदर्शन आणि सर्व शिक्षकांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याचे फळ मिळाले अशी प्रतिक्रिया मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी दिली. शाळेतील विद्यार्थिनीचे उत्कृष्ट संचलन पथक व झांज पथक निर्मिती, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात शाळेचे उत्कृष्ट राज्य स्तरावर यश, आय सी टी लॅब आस्ट्रॉनॉमी क्लब, मिनी सायन्स लब, इंग्रजी लॅब, गणित लब, हॅन्डवाश स्टेशन या सुविधांमुळे शैक्षणिक संपादनुकीत शाळेने उत्कृष्ट कार्य केले. मुलींची गळती थांबवण्यासाठी मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांची नाविन्यपूर्ण सायकल बँक, तीस अनाथ विद्यार्थी दत्तक पालक योजना, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी दानशूर पालकांनी चालू केलेला गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा, लाटी-काटी राज्यस्तरीय स्पर्धेत व रंगोत्सव सेलिब्रेशन मुंबई तर्फे आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत १९ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल यामुळे ही शाळा अनेक नामांकित संस्थेच्या यादीत अग्रक्रमाने ओळखली जाते. शाळेच्या या यशात उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार ज्ञानराज चौगुले, युवा नेते किरण गायकवाड, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, शिक्षण तज्ञ सदानंद शिंदे पाटील, अशोक पतंगे, शंकर सुरवसे, अमर वरवटे, किसन खंडागळे, शाळेचे माजी विद्यार्थी, पालक व उमरगा शहरातील दानशूर व्यक्तींचे मोलाचे सहकार्य लाभले. तंत्रस्नेही शिक्षक संजय रूपाजी, विद्यानंद सूत्रावे,धनराज तेलंग, बशीर शेख, सरिता उपासे, शिल्पा चंदनशिवे, ममता गायकवाड, सोनाली मुसळे ,सदानंद कुंभार, सुनिता राठोड वनमाला वाले नारायण अंकुशे या सर्व शिक्षकांच्या परिश्रमामुळे हे यश प्राप्त झाले.

# श्रमजीवी फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी नोकरीपूर्व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**आरंभ मराठी । उमरगा**




उमरगा येथील श्रमजीवी कॉलेज फार्मसी व हैद्राबाद येथील सुरा फार्मा लॅब यांच्यामध्ये इंडस्ट्रीयल ओरीएंट प्रोग्राम अर्थात नोकरीपूर्व कार्यशाळा या बाबत करार करण्यात आला आहे. श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसी व हैद्राबाद येथील सुरा फार्मा यांच्या संयुक्त विद्यमाने इंडस्ट्रीयल ओरिएंटल प्रोग्राम अर्थात नोकरीपूर्व कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत सुरा फार्मा लॅब व श्रमजीवी फार्मसी यांच्यात करार करण्यात आला. या वेळी सुरा फार्माचे सहाय्यक व्यवस्थापक डी. प्रणीतकुमार, प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर , उपप्राचार्या ज्योती आरसुडे-पेठकर, निकिता समानतारा, प्रा. रंगनाथ चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेत डी फार्मसी व बी. फार्मसी झालेल्या विद्यार्थ्यांना हैद्राबाद येथील सुरा फार्मा लॅबच्या वतीने औद्योगिक मेडिकल कोडींग, स्टॅस्टीक नालेसिस सिस्टीम, फार्माक्लोव्हीजीलन , क्लीनिकल डेटा मॅनेजमेंट, मेडिकल रायटींग स्कील एड बिलींग इत्यादी औषध निर्माण शास्त्रातील माहिती तंत्रज्ञानाचे सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणा मुळे विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळणे सहज सोपे होणार आहे. शिवाय या लॅबच्या वतीने औषध निर्माण शास्त्र क्षेत्रात नोकरी मिळवून देण्याची शाश्र्वती या करारात देण्यात आली आहे. या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर सुरा फार्मा लॅबच्या वतीने घेण्यात येणाऱ्या नोकरी पूर्व प्रशिक्षणाचा फायदा घेण्याचे आवाहन केले. सुरा लॅबचे सहाय्यक व्यवस्थापक यांनी औषध निर्माण शास्त्राच्या क्षेत्रातील व्यक्तीमत्व विकासाची माहिती दिली. कोर्स करणाऱ्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीला त्याच्या योग्यते प्रमाणे नोकरी मिळवून देण्याची त्यांनी खात्री दिली. प्रास्ताविक प्रा. किरण चोपने यांनी केले. सुत्रसंचलन प्रा. सुबोध कांबळे यांनी केले तर आभार पल्लवी पवार यांनी मानले.

# आता निलेश राणे हाती बांधणार शिवबंधन

**आरंभ मराठी । कणकवली**

राज्यातील राजकीय घडामोडी आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अगदी वेगाने सुरु आहेत. अशातच आता एक मोठी बातमी समोर आली आहे. माजी मुख्यमंत्री आणि भाजपचे खासदार नारायण राणे यांचे मोठे पुत्र निलेश राणे हे लवकरच शिवसेना शिंदे गटात एंट्री करणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उद्या (२३ ऑक्टोबर) संध्याकाळी ४ वाजता ते शिंदे गटात एंट्री करणार आहेत. निलेश राणे यांनी स्वत: पत्रकार परिषद घेऊन याबद्दलची माहिती दिली.

# जिल्हा व सत्र न्यायालय स्कूल कमेटी धाराशिव ची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आळणीस भेट

**आरंभ मराठी । धाराशिव**

शासनाने जिल्हा परिषद शाळेत भौतिक सुविधा तपासण्यासाठी व नसतील तर त्या तात्काळ उपलब्ध करण्यासाठी जिल्हानिहाय मा. जिल्हा व सत्र न्यायधीश यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय स्कूलकामेटीची स्थापना केली आहे . सदर जिल्हास्तरीय कमेटी प्र त्यक्ष शाळेत जाऊन पाहणी करून ज्या भौतिक सुविधा अपूर्ण आहेत त्या पूर्ण करण्यासाठी शासनाकडे अहवाल पाठवून शाळेस भौतिक सुविधा पुरवण्यासाठी प्रयत्न करीत असते. काल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आळणीस सदर स्कूल कमेटीने भेट देऊन भौतिक सुविधा विषयी पाहणी केली. यामद्ये, विद्यार्थ्यांना पिणाचे शुद्ध पाणी, हँडवॉश स्टेशनं, मुला मुलींसाठी स्वतंत्र स्वछता गृह, क्रिडांगणा, परसबाग,शाळेस संरक्षक भिंत, शाळा स्तरीय सर्व समित्या व त्यांचे कार्य,तक्रार पेटी, शालेय पोषण आहार, मुलांना गणवेश, बूट व सॉक्स,वर्ग खोल्या, आवश्यक कार्यरत शिक्षक, तसेच शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता यासह असंख्य बाबीची तपासनी करण्यात आली .पाथकाने प्रत्यक्ष वर्गात जाऊन विद्यार्थाची गुणवत्ता पहिली. शाळेत पूर्ण भौतिक सुविधा व गुणवत्ता चांगली आढळून आल्यामुळे स्कूल कमेटीने समाधान व्यक्त केले सर्व विद्यार्थी व शिक्षक यांचे अभिनंदन केले, तसेच शासनाकडून गणवेश वितरणाच्या प्रक्रियेत बदल केल्यामुळे चालू वर्षी अर्धे शैक्षणिक वर्ष संपले तरी अजून विद्यार्थांना गणवेश मिळाले नसल्याचे मुख्याध्यापक श्री बशीर तांबोळी यांनी कमेटीच्या निदर्शनास आणून दिले व गणवेश हे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत मिळाले पाहिजे अशीही अग्रही मागणी केली तसेच गणवेश वितरनाची नवी पद्धत रद्द करून पूर्वीप्रमाणे राबववी असे सांगितले.तरच विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी मुख्याध्यापक गणवेश पुरवतील, कमेटीने याची तात्काळ दाखल घेतली व तसा अहवाल पाठविण्यात येईल असे सांगितले. कमेटील सर्व सदस्यांचे पुस्तकं देऊन मुख्याध्यापक श्री बशीर तांबोळी यांनी स्वागत केले सदर कमेटीत, कमेटीचे अध्यक्ष तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश तसेच शिक्षणाधिकारी प्राथमिक श्री अशोक पाटील, शिक्षणाधिकारी माध्यमिक श्रीमती सुधा साळुंके,, सहायक अभियंता बांधकाम श्री चव्हाण साहेब, धाराशिव चे पोलीस निरीक्षक श्री जांभळे साहेब, गटशिक्षणाधिकारी धाराशिव श्री आसरार सय्यद साहेब, सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्री व्ही. आर. सूर्यवंशी, शिक्षण विस्तार अधिकारी श्री प्रकाश पारवे साहेब, श्री भारत देवगुडे साहेब, केंद्रप्रमुख श्री निलेश नागले साहेब, केंद्रीय मुख्याध्यापक श्री राजाभाऊ गाढवे यांच्या सह शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.



## विविध वृत्त...


### सुक्ष्म नागरी सहकारी पतसंस्थेचा वर्धापन दिन उत्साहात




**आरंभ मराठी । धाराशिव**

सुक्ष्म अर्बन पाचवा वर्धापन दिन थाटामाटात साजरा करण्यात आला.वर्धापन दिनाच्या निमित्ताने सूक्ष्म नागरी सहकारी पतसंस्थेच्या शाखेचे उद्घाटन कर्मचाऱ्यांच्या हस्ते व विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रगती नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन प्रशांत पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच प्रशांत भांगे,सुभाष पवार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अरूण कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आभार मुख्य शाखाधिकारी अधिकारी रत्नाकर कुलकर्णी यांनी मानले.यावेळी सभासद,कर्मचारी उपस्थित होते.

### रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांना स्मृतिदिनानिमित्त आदरांजली



**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित, रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आदरांजली अर्पित करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख म्हणाले की, संस्कार काय असतात? हे फक्त आईसाहेबांकडून शिकावेत. मी स्वतः खूप भाग्यवान आहे मला आईसाहेबांच्या सानिध्यात राहण्याचा योग आला. शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या इतकाच त्याग संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांनी केला आहे. त्यांचे विचार, त्यांचे स्वप्न पूर्ण करणे हीच खरी त्यांना आदरांजली असेल असे ते म्हणाले. याप्रसंगी कनिष्ठ विभागातील प्रा.सौ.भाग्यश्री गोंदकर यांनी देखील संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. सर्वप्रथम शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे आणि संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. केशव क्षीरसागर ,प्रा. माधव उगीले आदींसह महाविद्यालयातील सर्व गुरुदेव कार्यकर्ते, प्रशासकीय कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### उमरगा शहरातील महामार्गाची डांबराऐवजी मातीमिश्रीत मुरूम टाकून डागडुजी




**आरंभ मराठी । उमरगा**

उमरगा शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने मोठमोठ्या खड्यात माती मिश्रीत ठिसूळ खडक टाकून डागडुजी केली जात असल्याचे दिसून येत आहे. शहराच्या मधून जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात रहदारी असते. रस्त्यावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडले आहेत. या रस्त्यावर माती मिश्रीत ठिसूळ खडक टाकून डागडुजी केली जात आहे. त्यामुळे रस्त्यावर धुराळा उडत आहे. त्यामुळे डोळ्याचे विकार वाढत आहेत. धुळीमुळे विविध रोगाला आमंत्रण देण्यात येत आहे. रस्त्याची डागडुजी करण्यासाठी मातीमिश्रित मुरूम आणि खडकाचा उपयोग न करता डांबर टाकून रस्त्याचे काम करावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

### परिवर्तन महाशक्तीच्या निवडणूक समन्वयपदी धनंजय जाधव यांची निवड

**आरंभ मराठी । पुणे**

परिवर्तन महाशक्तीच्या विधानसभा निवडणूक सुकाणू समितीच्या पुणे येथील बैठकीत महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे धनंजय जाधव यांची समन्वयक तर सहसमन्वयक म्हणून प्रहार जनशक्तीचे गौरव जाधव तर स्वाभिमानी पक्षाचे योगेश पांडे या तिघांच्या नावाची अधिकृत निवडणूक समन्वयक म्हणून घोषणा करण्यात आली. परिवर्तन महाशक्तीच्या सुकाणू समितीची बैठक पुण्यातील म हाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या कार्यालयात पार पडली. या बैठकीला महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे संभाजीराजे छत्रपती, प्रहार जनशक्तीचे बच्चू कडू, स्वाभिमानी पक्षाचे राजू शेट्टी यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.


THIS LETTER PRINTED BY ADESH PRINTERS, RAMKRUSHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) AND PUBLISHED BY RAMKRISHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) ON BEHALF OF CHANDRASEN GOVINDRAO DESHMUKH AND PRINTED AT ADESH PRINTERS, RAM- KRUSHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST.DHARASHIV (MHARASHTRA) AND PUBLISHED AT RAMKRISHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) EDITOR SHRI. CHANDRASEN GOVINDRAO DESHMUKH.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०

# तुळजापूरमधून महायुतीची राणा पाटील यांनाच उमेदवारी


## रासप, वंचीतचेही उमेदवार ठरले

## महाविकास आघाडीचा पेच सुटेना; काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षात जागेसाठी रस्सीखेच

**सुभाष कुलकर्णी । आरंभ मराठी**

**तेर :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजले. धाराशिव जिल्ह्यातील चारही मतदारसंघात राजकीय वातावरण जोर धरत असल्याचे दिसून येत आहे. चारपैकी फक्त तुळजापूर मतदारसंघात महायुतीकडून विद्यमान भाजपा आमदार राणाजगजितसिंग पाटील यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तुळजापूर मधील रासप, वंचितचे उमेदवारही जाहीर झाले. मात्र महाविकास आघाडीच्या उमेदवाराची घोषणा अजूनही झाली नाही. उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून, महाविकास आघाडीचे घोडे अडले असल्याचे चित्र दिसत आहे. तुळजापूरात महाविकास आघाडीची उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांची दमछाक होत आहे.

तुळजापूर विधानसभा मतदारसंघ हा कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या पदस्पर्शाने पावन झालेला मतदार संघ आहे. या मतदारसंघात काँग्रेस व शेतकरी कामगार पक्षाचे वर्चस्व राहिलेले आहे. काँग्रेसने मधुकरराव चव्हाण यांच्या रूपाने १९९९ ते २०१४ पर्यंतच्या सलग चार निवडणुकीत विजय मिळविला. परंतु, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मधुकरराव चव्हाण पराभूत झाले. आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या रूपाने जिल्हाच्या इतिहासात विधानसभा निवडणुकीत प्रथमच भारतीय जनता पक्षाचे कमळ फुलले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसची महाविकास आघाडी व शिवसेना भाजप मध्ये लढत झाली होती. २०२४ च्या निवडणुकीत महायुतीतील भाजपचे विद्यमान आमदार राणाजगजितसिंह पाटील हे उमेदवारीसाठी प्रमुख दावेदार होते अपेक्षेप्रमाणे आ.पाटील यांनाच उमेदवारी मिळाली. परंपरागत मतदार संघ म्हणून काँग्रेस या जागेसाठी आग्रही आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अशोकराव जगदाळे हे विविध उपक्रमाच्या माध्यमातून मतदारसंघात संपर्क वाढवीत फिरत आहेत. त्याप्रमाणे शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने खासदार ओमराजे निंबाळकर, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख आ.कैलास घाटगे पाटील यांनी मतदारसंघात निष्ठावंत शिवसैनिकांचा मेळावा घेऊन शिवसैनिकांना सक्रीय केले आहे. तुळजापूर मतदारसंघ महाविकास आघाडीत नेमका कोणाच्या वाट्याला जातो त्यावरही बरीच गणिते अवलंबून आहेत. मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनीही राज्यात काही ठिकाणी उमेदवार उभे करण्याची घोषणा केली आहे. परंतु, धाराशिव जिल्ह्यात अजून एकाही उमेदवाराची घोषणा झाली नाही. महायुतीचा जुना मित्र असलेल्या रा.स.प.चे आश्रुबा कोळेकर (कोळेकरवाडी) हे उमेदवार आहेत. तर वंचितने डॉ. स्नेहा सोनकाटे (सिंदगाव) यांना निवडणूक रिंगणात उतरवले आहे. ओबीसी मतांवर डोळा ठेवून सोनकाटे यांना उमेदवारी दिली आहे.









### महाविकास आघाडीचे अजून ठरेना

एकीकडे महायुतीने राणा पाटील यांची उमेदवारी घोषित केलेली असली तरी महाविकास आघाडीत अजून काहीच हालचाल दिसून येत नाही. या जागेवर काँग्रेसचा हक्क असला तरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने देखील या जागेवर दावा केला आहे. तर दुसरीकडे अशोक जगदाळे यांनी मतदारसंघात जोरदार तयारी सुरू केली आहे. शिवसेना उबाठा पक्षाने मात्र तुळजापूर मतदार संघावर दावा केलेला नाही. काँग्रेस कडून धीरज पाटील यांनी तयारी केली असली तरी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनीही इच्छुक असल्याचे जाहीर केले आहे. वयाच्या नव्वदीत चव्हाण सक्रिय झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून संजय निंबाळकर यांनी गावभेट दौऱ्यातून उमेदवारीसाठी दावेदारी केली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून पुढच्या सहा दिवसात मतदार संघातील चित्र स्पष्ट होणार आहे.

### २०१९ मध्ये १८ उमेदवार

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत १८ उमेदवारांनी आपले नशीब अजमावले होते. यात अपक्ष उमेदवारांची संख्या अधिक होती. बहुतांश उमेदवारांची अनामतही शिल्लक राहिली नाही. सध्यातरी इच्छुकांची उमेदवारी मिळवण्यासाठी चढाओढ सुरु आहे. जरांगे पाटील यांनी सर्वच इच्छुकांना अर्ज दाखल करण्यास सांगितले असल्यामुळे यावेळी उमेदवारी अर्ज मोठ्या प्रमाणावर दाखल होण्याची शक्यता आहे. २९ ऑक्टोबर रोजी अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिवस आहे. त्यामुळे दिवाळीच्या सणानंतरच निवडणूक प्रचाराची धामधूम सुरु होणार आहे.

# मराठा आरक्षण लढ्यात २० वर्षे योगदान, शिवाजी पाडूळे यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता

**आरंभ मराठी । पुणे**



मराठा आरक्षणाच्या लढ्यात तब्बल २० वर्षांपासून योगदान दिलेले व्यक्तिमत्त्व शिवाजीभाऊ पाडूळे यांना पिंपरी चिंचवड विधानसभा क्षेत्रातून मनोज जरांगे-पाटील यांच्या वतीने अर्थात मराठा समाजाच्या वतीने उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे. पाडूळे यांचे योगदान विचारात घेऊन समजाचे त्यांना पाठबळ मिळेल,अशी शक्यता आहे. दरम्यान, त्यांनी मंगळवारी उमेदवारी अर्ज खरेदी केला असून, ते लवकरच अर्ज दखल करणार आहेत.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी अनेक जणांनी योगदान दिले आहे. पिंपरी चिंचवडमध्ये आरक्षणाचा हा लढा कायम लढणारे शिवाजीभाऊ पाडूळे यांना मानणारा मोठा वर्ग या भागात आहे.२० वर्षाचा संघर्षमय सामाजिक- राजकीय प्रवास समजून घेऊन २०५-चिंचवड विधानसभा निवडणुकीत जरांगे-पाटलांनी सामान्य कार्यकर्त्यास विश्र्वासाने संधी दिल्यास मायबाप जनता किती आशिर्वाद देईल,असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

आपला माणूस शिवाजी भाऊ पाडुळे,अशी त्यांची प्रतिमा आहे.ते म्हणाले, नवी सांगवी प्रभागात २०१७ ला विना पैशात ५००० मतदान मिळाले. शहरात आणखी पाच हजार मतांची ताकद आहे. म्हणजे स्वतः ची दहा हजार मतांची हक्काची सुरूवात आहे. जरांगे-पाटलांनी विश्वास टाकला तर, मराठा कार्ड,कोरोना काळात दहा लाख कर्ज रकमेतून दोन हजार कुटूंबांना केलेले जिवनावश्यक साहित्य वाटप आणि माझी जन्मभूमी बार्शी, सोलापूर , मराठवाड्यातील संघटन, मराठवाड्यातील आंदोलनातील सक्रीय सहभाग, दुष्काळात धाराशिवमध्ये स्वखर्चाने दोन महिने चालवलेली चारा छावणी, धाराशिव जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबासाठी दिवाळी साहित्य,शेतकऱ्यांना बियाणे वाटप आणि पिंपळेगुरवमधील प्रस्थापितांविरुद्ध राजकीय संघर्ष, याला न्याय मिळेल. माझ्यासारख्या सामान्य आणि सामाजिक तळमळ असलेल्या कार्यकर्त्यांना उमेदवारी देऊन मनोज दादा संधी देतील,असा आशावाद त्यांनी व्यक्त केला आहे.

# तारकचा बॉस परतल्याने हुशार योजना थांबली! बडे गुरुजी म्हणून बापूजी पुन्हा वाचवणार?

**आरंभ मराठी । मुंबई**

सोनी सब या वाहिनीवर 'तारक मेहता का उलटा चष्मा'या लोकप्रिय मालिकेला चाहत्यांकडून अतोनात प्रेम मिळत आहे. सर्वांचं मनोरंजन करणार्या या मालिकेत सध्या मजेदार पण तणावपूर्ण वळण येणार आहे. नेहमी कडक आणि मागणी करणारा तारक मेहताचा बॉस काही दिवसांसाठी दिल्लीला जाण्याचा विचार करतो, ज्यामुळे तारकला थोडा दिलासा मिळतो. मात्र त्याचा बॉस शहराबाहेर असताना, तारक असा दावा करून परिस्थितीचा फायदा घेतो. परंतु अचानक बॉस परत आल्यामुळे सर्वांची तारांबळ उडणार आहे. सर्व काही व्यवस्थित सुरु असताना अनपेक्षित घडते. बॉस अघोषितपणे मुंबईला परततो आणि बडे गुरुजींना भेटण्याचा आग्रह धरतो. भागीदारी जास्त आहे कारण कंपनीला बडे गुरुजींच्या व्यावसायिक सल्ल्याचा आधीच फायदा झाला आहे, परिणामी मोठा नफा झाला आहे. आता, तारकची जबाबदारी पुन्हा एकदा बापूजी (जेठालालचे वडील) यांना बडे गुरुजींचे रूप धारण करण्यास पटवून देण्याची जबाबदारी आहे, जसे तारकची नोकरी वाचवण्यासाठी त्यांनी यापूर्वीही केले होते.

# अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या राज्य उपाध्यक्षपदी लालासाहेब मगर यांचा निवडीबद्दल सत्कार



**आरंभ मराठी । धाराशिव**

२३ अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या राज्य उपाध्यक्षपदी लालासाहेब मगर यांची निवड झाल्याबद्दल धाराशिव शाखेच्या वतीने शाहू शिक्षक सोसायटी मध्ये नुकताच सत्कार करण्यात आला शिक्षक नेते बशीर तांबोळी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सत्कार कार्यक्रमासाठी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या महिला कार्यकारणी सदस्य सविताताई पांढरे, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब वाघमारे, जिल्हा सरचिटणीस अविनाश मोकाशे, नगरपरिषद विभाग जिल्हाप्रमुख राजेंद्र पवार, शाहू शिक्षक सोसायटीचे चेअरमन सुरेश भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती या वेळी लालासाहेब मगर बशीर तांबोळी यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमास संतोष डोके, राजाभाऊ गिरी, जगदीश जाकते, प्रदीप तांबे, बाळासाहेब कांबळे, राजाभाऊ आकोसकर, लक्ष्मण घोडके, संजय गाडेकर, मिलिंद जानराव, शाहू सोसायटीचे माजी चेअरमन मिलिंद धावारे, श्रीहरी बिडवे, प्रवीण गाडे, सुधीर गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष मालोजी वाघमारे, मारोती काळे, बोडके सर, धाराशिव तालुकाध्यक्ष नागनाथ मुडबे, लोहारा तालुकाध्यक्ष सुधीर घोडके, धाराशिव तालुका सरचिटणीस बालाजी निंबाळकर, शिवाजी साखरे, धम्मदीप सवाई, जीवन पाटील, शिवलिंग हंकारे, चंद्रसेन आल्टे,भास्कर मस्के, गौतम रणदिवे,पंकज मोरे, प्रभाकर लांडगे, रजनीकांत तुपारे, ज्ञानेश्र्वर आदटराव, शेखू जेटीथोर, प्रेमनाथ जाधव, आण्णासाहेब इताले, नंदकुमार तोडकरी, दिनकर रसाळ, विमल मक्तेदार, क्षिरसागर सर, सुधाकर मस्के यांच्यासह बहुसंख्य जण उपस्थिती होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब वाघमारे यांनी केले तर आभार जिल्हा सरचिटणीस अविनाश मोकाशे यांनी मानले.

# काळ्या बाजारात जाणारा तीन लाखांचा अवैध गुटखा मुरूम पोलिसांनी पकडला

**आरंभ मराठी । मुरूम**

काळ्या बाजारात जाणारा तीन लाखांचा अवैध गुटखा पोलिसांनी गाडीसह पकडून मोठी कारवाई केली. दिनांक २१ ऑक्टोबर रोजी मुरुम पोलीस ठाण्याचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत कोथळी बेळंब जाणाऱ्या रोडवर पुलाच्या जवळ नाकाबंदीस असताना पथकास गुप्त बातमी मिळाली की, एका पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट डिझायर वाहनामध्ये अवैध गुटख्याची वाहतूक केली जात आहे. त्यावर या पथकाने स्विफ्ट डिझायर गाडी (क्र एमएच ०१ बी.टी.६१४४) थांबवून चेक केले असता, त्यात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला गोवा गुटखा दिसून आला. त्या वाहनाच्या चालकास त्याचे नाव व गाव विचारले असता, त्याने त्याचे शेख तौफीक गणी शेख (वय ३१ वर्षे, रा. अजमेर नगर बालेपीर नगर रोड, बीड) असे सांगितले. त्यावर पथकाने सदर स्विफ्ट कार व त्यातील मिळून आलेला हिरा पान मसाला १० पोते, रॉयल ७१७ तंबाखु नावाचे एकुण २०० पॉकेट असा अंदाजे ३,००,००० किंमतीचा गुटखा ताब्यात घेतला. यासह स्विफ्ट डिझायर गाडी असा एकुण ९,००,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. यावेळी आरोपी शेख तौफीक गणी शेख याला ताब्यात घेवून त्याच्या विरुध्द पोलीस ठाणे मुरुम येथे गुरनं ३०३/२०२४ भा.न्या. सं. कलम २२३,२७४,२७५, १२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा अधिक तपास परि. पोलीस उप निरीक्षक गाडेकर करत आहे.

# निवडणूक खर्च निरीक्षक अलूरू व्यंकट राव धाराशिव जिल्ह्यात दाखल

**आरंभ मराठी । धाराशिव**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ करीता भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निवडणूक खर्च निरीक्षक अलुरू व्यंकट राव (IRS) यांचे मंगळवारी (दि.२२) जिल्हयात आगमन झाले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष व अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. राव यांचा मुक्काम व कार्यालय शासकीय विश्रामगृह, शिंगोली येथील अजंठा या सूटमध्ये आहे. त्यांच्या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२४७२ - २३५४७० असा असून त्यांचा भ्रमणध्वनी ९०२१५२४२१२ हा आहे. निवडणूक खर्च निरीक्षक यांच्याशी निवडणूक विषयक प्रश्नाबाबत भेटीची वेळ ही सकाळी १० ते ११ दरम्यानची निश्चित केली आहे.




## ठळक

### गर्दीचा फायदा घेऊन अडीच लाखांचे सोने केले लंपास

**आरंभ मराठी । तुळजापूर**

गर्दीचा फायदा घेईन अज्ञात चोरट्याने दोन महिलांच्या गळ्यातील तब्बल अडीच लाख रुपयांचे सोने लंपास केल्याची घटना तुळजापूर शहरात घडली. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, गदेवी सुरेश पुजारी (वय ३४ वर्षे, रा. गौडगाव बू ता. अक्कलकोट जि. सोलापूर) या व उषा उदयराव वारकरी (वय ६३ वर्षे, रा. लातुर) या दोघींच्या गळ्यातील ४१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दोन मिनी गंठन दिनांक १७ ऑक्टोबर रोजी अज्ञात चोरट्याने चोरून नेले. चोरलेल्या सोन्याची किंमत २ लाख ४८ हजार २४४ रुपये होती. तुळजापूर येथील घाटशिळ येथे विश्र्वनाथ कॉर्नर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून ही चोरी केली. या प्रकरणी फिर्यादी गदेवी पुजारी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### बसमध्ये चढत असताना महिलेची सोन्याची पाटली चोरली

**आरंभ मराठी । धाराशिव**

बस मध्ये चढत असलेल्या महिलेची गर्दीचा फायदा घेऊन सोन्याची पाटली अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना धाराशिव येथील बस स्थानकात घडली. सरोजा प्रभाकर डांगे, (वय ७० वर्षे, रा. गणेश नगर धाराशिव) या दिनांक १७ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास धाराशिव बसस्थानक येथे तुळजापूर ते नाशिक या बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून सरोजा डांगे यांच्या डाव्या हातातील ५० हजार रुपये किंमतीची २५ ग्रॅम वजनाची सोन्याची पाटली चोरुन नेली. सरोजा डांगे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. गेल्या काही महिन्यांपासून धाराशिव बस स्थानकात चोरीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून, पोलिसांनी बस स्थानक परिसरात सुरक्षा वाढवावी अशी मागणी प्रवाशातून होत आहे.

### होर्टी ग्रामपंचायत कार्यालयात शासकीय योजनांची माहिती देणारे शिबीर

**आरंभ मराठी । नळदुर्ग**

तुळजापूर तालुक्यातील होर्टी येथील ग्रामपंचायत कार्यालयात टाटा एआयजी बेंगलोर, एन एम पी पल्स धाराशिव व दत्ता भोसले मित्र मंडळ होर्टी यांच्या संयुक्त विद्यमाने शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य माणसाला झाला पाहिजे या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयुष्यमान भारत योजना ,ई श्रम योजना, प्रधान मंत्री जीवन ज्योती योजना व प्रधानमंत्री सुरक्षा योजना अशा विविध योजनांचा लाभ ४६७ लोकांनी घेतला. या वेळी माजी सरपंच ज्ञानेश्र्वर भोसले ,प्रसाद भोसले, दत्ता भोसले, गणेश खराडे, संजय गुंजिटे, पद्माकर भोसले, अंकुश भोसले, चैतन्य सगर, संस्थेचे जिल्हा समन्वयक आकाश नालेगावकर, अलिम शेख महादेव ढगे, साजिदा शेख व दत्ता भोसले मित्र मंडळाचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. दत्ता भोसले मित्र मंडळाच्या वतीने शासनाकडून मिळणाऱ्या योजनाविषयी जनजागृती करण्यात आली.

### धाराशिव शहरातील अतिक्रमण काढण्यासाठी नागरीक व्यापारी यांचे मुख्याधिकारी यांना निवेदन

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव शहरातील नेहरु चौक येथील माऊली चौक ते चौधरी दुकानापर्यंतच्या अतिक्रमणाने नागरिकांची खुप गैरसोय होत आहे. या भागात छोटी मोठी व्यापारी दुकाने असुन, जुनी बाजारपेठ म्हणुन ओळखली जाते. मध्यंतरी सतत होणाऱ्या अपघातापासुन संरक्षण म्हणुन लोखंडी पाईपचे संरक्षण कठडे लावले आहेत. त्याच लोखंडी पाईपच्या संरक्षक कठड्याला अतिक्रमणाने विळखा घातला आहे. तर या अतिक्रमणामुळे तिथेच खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांची वाहने लावल्यामुळे रस्ता छोटा होतो व यापासुन परत अपघात होत आहेत. त्यातच मसाला दुकानासमोरुन येतांना मोटार गाड्या पायवाट असलेल्या वाटेतून रहदारी करतात. अशात महिला भगिनीस धक्का बसला जातो व तक्रारी वाढतात. यासाठी येथील अतिक्रमण काढणे गरजेचे आहे. माऊली चौक ते चौधरी दुकानापर्यंतचे सर्व अतिक्रमण काढुन रस्ता मोकळा करुन द्यावा व व्यापाऱ्यांची तसेच येथील रहिवाशांना होणाऱ्या गैरसोयी पासुन न्याय द्यावा अशी विनंती लेखी निवेदनातुन नगर परिषदेच्या मुख्याधिकारी वसुधा फड यांच्या कडे केली आहे. जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांना एक प्रत देण्यात आली आहे. निवेदनावर प्रशांत अंबुरे, गणेश वाघमारे, किरण कठारे, अमोल कठारे, रुपेश कठारे, माऊली मेडिकल, नितिन अंधारे, बॉम्बे ग्लास सेंटर, शैलेश कपाळे,न्यु शंकर ड्रेसेस,एस एम मुसळे,एम एस गार्डे, गणेश गार्डे,देविचंद वॉच सेंटर,अमित जगधने,सतिश अंबुरे,चेतन गोवर्धन यांच्या सह्या आहेत.

### कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**आरंभ मराठी । धाराशिव**

दुचाकी स्वाराला कार चालकाने जोराची धडक दिल्यामुळे यामध्ये दुचाकीस्वार जागीच ठार झाला. हा अपघात धाराशिव ते तुळजापूर रोडवरील सिद्धेश्र्वर वडगाव या गावाजवळ झाला. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीचे नाव गोविंद बालाजी माळी (वय ३४ वर्षे, रा. कानेगाव ता. लोहारा) असे आहे. गोविंद माळी हे दिनांक १९ ऑक्टोबर रोजी मोटरसायकल (क्र एमएच २५ ए.एन. ९८३८) वरुन तुळजापूर ते धाराशिव येथे जात होते. दरम्यान वडगांव सिध्देश्र्वर येथे तुळजापूर ते धाराशिव हायवे रोडवरील उड्डान पुलाजवळील रोडलगत टाटा टॅगो कार (क्र एम.एच २५ ए.एल. ८८२९) च्या चालकाने त्याच्या ताब्यातील कार हायगयी व निष्काळजीपणे चालवून गोविंद माळी यांच्या मोटरसायकलला धडक दिली. या अपघातात गोविंद माळी हे गंभीर जखमी होवून मयत झाले. या प्रकरणी धनराज मारुती फुलमाळी (वय ४३ वर्षे, रा. कानेगाव) यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम २८१, १०६(१), १०६(२) सह १८४ मो वा का अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

